माण देशी
बँक

रजि. नं. एस.ए.टी. / माण/बी.एन.के./ओ./११९, सन १९९६
दि. ३१/१०/९६, एल.एन.एम.ए.एच.यु.बी.डी. १३६१ पी.

# माण देशी
## महिला सहकारी बँक लि., म्हसवड

ता. माण, जि. सातारा



२१ वा वार्षिक अहवाल सन २०१७-२०१८

ऑडीट वर्ग 'अ'

# संचालक मंडळ (सन २०१६-१७ ते २०२१-२२)

माण देशी
बँक



श्रीमती चेतना सिन्हा
अध्यक्षा (म्हसवड)



सौ. ललीता सा. पोळ
उपाध्यक्षा (देवापूर)



सौ. मंजुषा रा. सुर्यवंशी
संचालिका (म्हसवड)



सौ. राजश्री नि. दोशी
संचालिका (म्हसवड)



सौ. वनिता जा. पिसे
संचालिका (म्हसवड)



सौ. राणी वि. बनगर
संचालिका (म्हसवड)



सौ. रोहिणी ता. बाड
संचालिका (पर्यंती)



सौ. सत्यभामा बा. खाडे
संचालिका (पळशी)



सौ. रेखा अ. कट्टे
संचालिका (गोंदवले बु.)



सौ. रोहिणी प्र. कारंडे
संचालिका (दहिवडी)



सौ. अश्विनी वि. पवार
संचालिका (उंबर्डे)



सौ. सुवर्णादेवी न. पाटील
संचालिका (सातारा)



कु. वर्षा ल. निगवेकर
संचालिका (सातारा)



श्री. विजयकुमार केसकर
तज्ञ संचालक (गोंदवले बु.।।)



सौ. दिपाली गवळी
तज्ञ संचालिका (कोल्हापूर)



सौ. रेखा कुलकर्णी
मुख्य कार्यकारी अधिकारी




मा. श्री. सुरेश प्रभु केंद्रिय वाणिज्य आणि उद्योग मंत्री यांच्याशी
''जागतिक आर्थिक परिषद'' दावोस येथे चर्चा करताना
श्रीमती चेतना सिन्हा.



दि. २० ऑक्टोबर २०१७ रोजी ''कौन बनेगा करोडपती''
एपिसोड नं. ९ या कार्यक्रमामध्ये माण देशीच्या कार्याची
दखल घेवून श्रीमती चेतना सिन्हा यांना आमंत्रित करण्यात आले
त्याप्रसंगी महानायक अमिताभजी बच्चन व अभिनेता आयुष्मान खुराना.



दि. २३ फेब्रुवारी २०१८ रोजी दि आर्ट
ऑफ लिव्हिंग इंटरनॅशनल सेंटर बेंगलोर
यांच्यातर्फे आयोजित ''आंतरराष्ट्रीय
महिला परिषद'' मध्ये आर्ट ऑफ
लिव्हिंग इंटरनॅशनल सेंटरचे संस्थापक
गुरुदेव श्री. श्री. रवि शंकर यांच्या हस्ते
श्रीमती चेतना सिन्हा यांना गौरविण्यात
आले.



रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चरल बॅंकिंग, पुणे (CAB) येथे येल स्कुल ऑफ मॅनेजमेंटचे विद्यार्थी व माण देशी महिला सहकारी बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. रेखा कुलकर्णी यांनी भेट दिली समवेत श्रीमती मधुमिता देवसरकार, प्राचार्य CAB रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, पुणे, मा. डॉ. अजितकुमार Faculty Member CAB रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, पुणे व समवेत इतर अधिकारी

दि. २६ नोव्हेंबर २०१७ रोजी ''माण देशी महोत्सव'' सातारा येथे मा. श्वेता सिंघल जिल्हाधिकारी, सातारा यांनी भेट देवून महिलांनी बनविलेल्या वस्तुंचे कौतूक केले व महिलांशी हितगुज साधले.






दि. २५ नोव्हेंबर २०१७ रोजी ''माण देशी महोत्सव'' सातारा येथील कार्यक्रमात माण देशी बँकेमध्ये खातेदार असलेल्या व माण देशी फौंडेशन मधून उद्योजिका झालेल्या महिलांना पुरस्कार देवून गौरविण्यात आले. त्याप्रसंगी सिनेअभिनेत्री सौ. निवेदिता सराफ, मा. श्री. उदय गुजर चार्टर्ड अकौंटंट, पुणे, सौ. संगिता अग्रवाल, चार्टर्ड अकौंटंट, पुणे व समवेत माण देशी बँक व फौंडेशनचे संचालक

# २१ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

बँकेच्या सर्व सभासदांना कळविणेत येते की, आपल्या बँकेची २१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. ०१।०९।२०१८ रोजी दुपारी १२ वाजता तृप्ती मंगल कार्यालय,सातारा-पंढरपूर रोड, म्हसवड येथे बँकेच्या अध्यक्षा मा. श्रीमती चेतना विजय सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी बोलविण्यात आली. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे ही विनंती.

## • सभेपुढील विषय •

१. दि. ०२/०९/२०१७ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. दि. ३१ मार्च २०१८ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा मा.संचालक मंडळाने सादर केलेला वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफातोटा पत्रक वाचून स्वीकृत करणे.
३. दि. ३१ मार्च २०१८ अखेरच्या मा.संचालक मंडळाने शिफारस केलेल्या नफा विभागणीस मंजुरी देणे व लाभांश जाहीर करणे.
४. सन २०१७-२०१८ चे शासकीय लेखापरीक्षण अहवाल व त्याचा दोषदुरुस्ती अहवाल वाचून नोंद घेणे.
५. सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षाकरिता वैधानिक लेखापरीक्षकाची नेमणूक करणे व मेहनताना ठरविणे.
६. सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षाकरिता अंतर्गत लेखापरीक्षकाची नेमणूक करणे व मेहनताना ठरविणे.
७. सन २०१८-२०१९ सालच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे व सन २०१७-२०१८ मध्ये अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे.
८. संचालक व त्यांच्या नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.
९. मा. संचालक मंडळाने शिफारस केलेले पोट नियम दुरुस्तीस मंजूरी देणे.
१०. माण देशी महिला सहकारी बँक व माण देशी फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविलेल्या उपक्रमांची चर्चा करुन नोंद घेणे.
११. अनुत्पादित कर्ज खात्यांची बाकी त्यापोटी असणाऱ्या स्वतंत्र तरतुदीमधून वसुली हक्क अबाधित ठेवून निर्लेखित करणेबाबत निर्णय घेवून मंजुरी देणे.
१२. वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे.
१३. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे.

संचालक मंडळाच्या आदेशावरुन
**माण देशी महिला सह. बँक लि. म्हसवड**

स्थळ :- म्हसवड
दिनांक १४/०८/२०१८

**सौ. रेखा सु. कुलकर्णी**
मुख्य कार्यकारी अधिकारी

विशेष सुचना :-

१. गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर सभा घेणेत येईल. त्या सभेस गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.
२. कामकाजासंदर्भात विचारावयाचे प्रश्न आणि सूचना दि. २५/०८/२०१८ पूर्वी बँकेच्या मुख्य कार्यालयात मिळतील अशा रितीने पाठवाव्यात.
३. बँकेचा ३१/०३/२०१८ चा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक हे बँकेच्या नोंदणीकृत मुख्य कार्यालय व शाखांच्या नोटीस बोर्डावरती उपलब्ध करून देण्यात आले आहे, तसेच बँकेची वेबसाईट www.manndeshibank.com वर प्रसिद्ध केली आहे.

**सन्माननीय सभासद भगिनींनो,**

माण देशी महिला सहकारी बँकेने २२ व्या वर्षात पदार्पण केले. २० वर्षापूर्वी जेव्हा महिलांना त्यांचे जीवन जगायचे होते, बचत करायची होती, बँका त्यांची खाती उघडणेस तयार नव्हत्या. कारण छोट्या रकमेची बचत करणाऱ्या महिलांची खाती उघडणे त्यांना परवडणारे नव्हते. पण महिला बरोबर सांगत होत्या, त्यांना बचत करणेसाठी फक्त ''**सुरक्षित आणि संरक्षित**'' जागा पाहिजे आहे. आणि यातूनच पहिली ग्रामीण महिलांची माण देशी बँक सुरु झाली. आमचा मार्ग सरळ होता, '' **गरिबांसाठी सोयी देताना, आपल्या विचारांमध्ये श्रीमंती असावी.**''

मायक्रोफायनान्स उद्योग हा भारतामध्ये मोठा आणि यशस्वी आहे. याचं कारण आहे– महिला **कर्ज घेतात, ते वेळेवर परतफेड करतात,** त्यांनी सिद्ध करुन दाखविले आहे की त्या बँकिंग करणेसाठी सक्षम आहेत. माण देशीच्या विविध उपक्रमांमुळे महिलांच्या छोट्या–छोट्या स्वप्नांना बळ मिळत आहे. माण देशातील उत्पादनांना महोत्सवाच्या माध्यमातून बाजारपेठ मिळत असल्याने महिलांमधील आत्मविश्वास वाढत चालला आहे. महिला आता छोट्या–छोट्या स्वप्नांतून बाहेर पडून मोठमोठी स्वप्ने साकार करु लागली आहेत. दारिद्र्यात न राहता, भरभराटीकडे त्यांचा कल जावू लागला आहे.

माण देशी बँक महिलांना बचत, कर्जाची सोय तर देतेच पण ही पहिली बँक आहे जीने **महिलांसाठी पेन्शन योजना** सुरु केली. आज बँकेच्या ७ शाखा सातारा व पुणे जिल्ह्यामध्ये असून नुकताच बँकेला कामोठे, **नवी मुंबइ** येथे **८ वी शाखा** उघडणेसाठी आणि **मोबाईल बँकिंगसाठी** परवाना मिळाला आहे. ९०००० पेक्षा जास्त महिला माण देशीबरोबर बँकिंग करीत आहेत. या महिलांना बँकेने घरपोच/व्यवसायाच्या जागेवर **डोअरस्टेप बँकिंग** सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. महिला जेव्हा बँकिंग करु लागल्या तेव्हा हक्काने सांगू लागल्या, '' आम्हाला आमचे व्यवसाय उभारणेसाठी मोठे कर्ज, बाजारपेठ पाहिजे. व्यवसायात जम बसविणेसाठी आम्हाला अजून मजबूत बनवा.'' माण देशीने ग्रामीण महिलांसाठी पहिली '' बिझनेस-स्कूल'' चालू केले. आज ३५०००० महिलांनी या बिझनेस स्कूलमधून लाभ घेतला आहे. आज माण देशी महिला, बँकेबरोबर रेडिओ देखील चालवित आहेत.

यावर्षी, खऱ्या अर्थाने माण देशीचे कार्य वाखाणले गेले, ते म्हणजे ४८ व्या जागतिक आर्थिक परिषदेच्या (वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम) मंचावर स्थानापन्न होणाऱ्या सात सह–अध्यक्षांमध्ये, अशियातील एकमेव महिला म्हणून माझी निवड करण्यात आली. ही आर्थिक परिषद २३ ते २६ जानेवारी या काळात स्वित्झरलँडमधील दावोस येथे पार पडली. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम हे जगातील महत्वाच्या विचारपीठांपैकी एक मानले जाते. जगातील राजकीय, उद्योग, शैक्षणिक आणि अन्य क्षेत्रातील नेतृत्वांना एकत्र आणून जागतिक, शैक्षणिक व औद्योगिक दिशा ठरविणे हे या परिषदेचे उद्दीष्ट आहे. महिलांचा स्वतःच्या पैशांवर

ताबा रहावा, या उद्देशाने १९९७ मध्ये ग्रामीण महिलांसाठी बँक सुरु केली. माण देशीच्या माध्यमातून अनेक सुक्ष्म-लघू महिला उद्योजिकांना सुक्ष्म अर्थपुरवठा केला. '' ग्रामीण भागातील महिला उद्योजकांना अर्थपुरवठा करण्यासाठी बँकांनी पुढे आले पाहिजे. जागतिक बँकेनेही पुढाकार घेवून महिला उद्योजकांना अर्थपुरवठा करण्याबरोबर त्यांच्या मालाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे मत मी या परिषदेमध्ये मांडले. या जागतिक आर्थिक परिषदेचे उद्घाटकीय भाषण भारताच्या पंतप्रधानांनी केले आणि त्या जागतिक परिषदेचे सह-अध्यक्ष पद पण मला म्हणजे भारतीय महिलेकडे आले होते. भारतातील ग्रामीण महिलांचा आवाज घेवून मी त्या परिषदेचे प्रतिनिधीत्व केले. माण देशी महिलांच्या हाताला काम आणि दुष्काळी भागातील लोकांना चांगले जगण्याचा अधिकार मिळवून देत जागतिक पातळीवर माण देशीची ओळख निर्माण झाली आहे.

सोनी टीव्ही प्रस्तुत '' कौन बनेगा करोडपती?'' च्या कार्यक्रमात २० ऑक्टोबर रोजी माण देशी फौंडेशनच्या वतीने मी खेळले. सुपरस्टार बिग-बी बरोबरच लाखो चाहत्यांची मने जिंकून आपल्या बुद्धिच्या जोरावर ५० लाख रुपये जिंकले. केबीसी च्या या खेळातून जिंकलेल्या रक्कमेचा उपयोग १०० मुलींना सायकल वाटप व बंधारा बांधण्यासाठी करण्यात आला.

महिलांचे कला, कौशल्य व कष्ट व्यवसायरुपाने सर्व जगासमोर यावे या उद्देशाने या महिलांना मार्केटची संधी माण देशी तर्फे उपलब्ध करुन देण्यात येते. माण देशीची **''डिजिटल दिदी (महिला)'' मोबाईल व्हॅनमधून माण देशी बँक आठवड्या-बाजारामध्ये व्यवसाय करणाऱ्या महिलांचे व्यवसाय ''डिजिटल'' बनवित आहे.** या महिला स्वत: वस्तूंचे उत्पादन करतात व विक्रीही करतात. जगभरातील महिलांच्या तुलनेत आपल्या महिला सुद्धा अजिबात कोठेही कमी नसून रुपे डेबिट कार्ड, व्हाटसअप, पेटीएम चा वापर करुन या महिला लाखो रुपयांची उलाढाल स्वत: करत आहेत, याचा मला अभिमान आहे. मोठा व्यवसाय उभा करणाऱ्या या महिलांचे खरे भांडवल हे पैसे नसून त्यांचे धाडस व कष्ट हेच आहे.

**माण देशी बँकेच्या सर्व सभासद, ठेवीदार, खातेदार व कर्जदारांनी आपले जे अनमोल योगदान दिले अशाच सहकार्याची अपेक्षा बँकेला आपल्याकडून आहे.**

आपली स्नेहांकित,
श्रीमती चेतना सिन्हा
अध्यक्षा

# चालू वर्षातील घडामोडी

माण देशी महिला सहकारी बँकेने २२ व्या वर्षात पदार्पण केले आहे. दुष्काळी माण तालुक्यातील कष्टकरी महिलांच्या आर्थिक सबलीकरणाच्या प्रमुख उद्देशाने चेतना सिन्हा यांनी माण देशी महिला सहकारी बँकेची स्थापना केली. कारण महिला सक्षम झाल्यानंतर देश सक्षम होईल. या कार्यामुळे गेल्या एकवीस वर्षाच्या कालखंडात माण देशी महिलांना खऱ्या अर्थाने सक्षमीकरणाची चालना मिळू शकली.

सन २०१६-१७ ची विशेष बाब म्हणजे, माण देशी महिला बँकेने ई कॉमर्स बँकिंग सुरु केले आहे. चालू आर्थिक वर्षात बँकेच्या म्हसवड व धायरी शाखेमध्ये एटीएम मशिन सेवा सुरु केली आहे. बँकेच्या सर्व शाखांमध्ये एटीएम मशिन बसविण्याचा बँकेचा मानस आहे.

रुपे डेबिट कार्ड, एटीएम सेवा आपल्या शाखांमध्ये सुरु आहे. बँकेच्या ग्राहकांना रुपेकार्ड वापरण्याची सोय उपलब्ध करुन देण्याबरोबरच आठवडे बाजारात व्यवसाय करणाऱ्या महिलांसाठी हे कार्ड वापरण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. यामुळे ग्राहकांना त्यांच्या दारात म्हणजेच व्यवसायाच्या ठिकाणी एटीएमच्या माध्यमातून सेवा पुरविण्याची सोय निर्माण झाली आहे. याबरोबरच माण देशी बँकेने आरटीजीएस, एनईएफटी व एसएमएस बँकिंगसारख्या सुविधा देखील सुरु आहेत.

## बँकेने ग्राहकांसाठी उपलब्ध केलेल्या सेवा:

**१. कोअर बँकिंग:** बँकेने कोअर बँकिंग प्रणालीचा अवलंब केला असून बँकेच्या सर्व ग्राहकांसाठी एसएमएस बँकींगची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. ज्या ग्राहकांनी बँकेकडे आपल्या मोबाईल नंबरची नोंदणी केली अशा सर्व ग्राहकांना त्यांच्या खात्यावरील प्रत्येक व्यवहाराच्या नोंदी एसएमएस द्वारे कळविल्या जातात.

**२. रुपे डेबीट कार्ड:** बँकेने अत्याधुनिक मायक्रो एटीएम मशीन व रुपे डेबीट कार्ड च्या सहाय्याने आठवडा बाजारात बसून व्यवसाय करणाऱ्या महिलांना त्यांच्या व्यवसायाच्या ठिकाणीच सर्व आर्थिक व्यवहार करता यावेत याची सोय उपलब्ध करुन दिली आहे. बँकेने ईएमव्ही रुपे डेबीट कार्ड व विक्री केंद्र (POS) सेवा सुरु केली आहे. याद्वारे ग्राहकांना शॉपींग मॉल्स, पेट्रोल पंप, हॉटेल्स्, इन्शुरन्स इ. ठिकाणी रुपे कार्ड द्वारे पेमेंट करणे शक्य आहे. बँकेने रुपे कार्ड अंतर्गत ग्राहकांना एटीएमची २४X७ सुविधा उपलब्ध करुन दिली असून देशांतर्गत इतर कोणत्याही बँकेच्या एटीएम मधून पैसे काढणे शक्य झाले आहे.

**३. ए.टी.एम. सुविधा:** माण देशी बँकेने शाखा म्हसवड व शाखा धायरी अंतर्गत माण देशी बँकेची On site ए.टी.एम. सुविधा सुरु केली आहे.

**४. मोबाईल बँकिंग लायसेन्स व आय एम पी एस सुविधा:** माण देशी बँकेस आय एम पी एस अंतर्गत मोबाईल बँकिग/इंटरनेट साठीचे लायसेन्स देखील प्राप्त झाले आहे. त्याअंतर्गत सेवा लकरच सुरु होतील. Immediate payment service या अंतर्गत कोणत्याही बँकेतील खातेदारांचे खातेमध्ये मोबाईलद्वारे त्वरित रक्कम पाठविण्याची सुविधा सुरु होईल. तसेच इंटरनेट बँकिंग सुविधा देखील सुरु होणार आहे.

**५. मोबाईल बँक कलेक्शन सिस्टिम ॲप:-** आता माण देशी बँकेमध्ये मोबाईल ॲप्लीकेशनद्वारे टेक्नोस्पायर टेक्नॉलॉजीस् च्या Mobile Bank collection System(BCS) ची सुविधा सुरु करण्यात आली. आपण हे ॲप ॲण्ड्रॉईड मोबाईलमध्ये घेऊन ते माण देशी बँकेमधून ॲक्टिवेट करुन दैनंदिन collection किंवा वेगवेगळ्या बचत खात्यामध्ये Online अथवा offline या दोन्ही मोडमध्ये काम करु शकता व पैसे जमा करु शकता. तसेच बिझनेस करस्पोडंटस् हे ॲप अगदी सहज हाताळू शकतात. यामध्ये आपण बचत खात्यांमध्ये बँकेच्या अधिकृत एजंट (Business correspondent Agent) द्वारे पैसे भरु शकता.

**एस एम एस सुविधा-** पैशाचा व्यवहार झाल्यानंतर बँकेच्या ग्राहकांना त्यांच्या खात्याला नोंद असलेल्या मोबाईल नंबर वरती त्वरीत SMS जातो व छोट्या वायरलेस Thermal printer द्वारे पैसे जमा केलेल्याची पावती देखील भेटते.

**६. आय.एफ.एस.कोडः** बँकेचा आय.एफ.एस.कोड(YESBOMAN001) असुन तो प्रत्येक चेकवर तसेच पासबुकवर नमुद आहे. या कोडद्वारे बँकेच्या खातेदारास देशांतर्गत कोणत्याही बँकेकडून रक्कम आपल्या बँकेतील खात्यावर थेट जमा करता येईल.

**७. आरटीजीएस व एनईएफटीः** बँकेने इनवर्ड व आऊटवर्ड आरटीजीएस व एनईएफटीची सुविधा ग्राहकांसाठी उपलब्ध करुन दिली आहे. आऊटवर्ड आरटीजीएसने देशांतर्गत कोणत्याही बँकेच्या खात्यात आपल्या बँकेच्या खात्यातील रक्कम ट्रान्सफर करता येईल व इनवर्ड आरटीजीएसच्या माध्यमातून रक्कम स्वीकारली जाईल.

**८. सीटीएस क्लिअरींग सुविधाः** बँकेने ग्राहकांना सीटीएस क्लिअरींगची सुविधा उपलब्ध करुन दिली असून या प्रणाली अंतर्गत देशातील कोणत्याही शहरातील चेकची रक्कम (जर संबंधित बँक सीटीएस क्लिअरींगची मेंबर असलेस) दुसऱ्या दिवशी संबंधीत खातेदाराच्या खात्यात थेट जमा केली जाते.

**९. पॅन कार्डः** बँकेने आपल्या ग्राहकांसाठी नवीन पॅन कार्ड काढणेची सुविधा उपलब्ध करुन दिली असून ज्यांना पॅन कार्ड काढावयाचे असेल त्यांनी जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.

**१०. वीज बीलः** बँकेच्या शाखांमध्ये वीज बील स्वीकारण्याची सोय उपलब्ध आहे.

**११. हेल्प लाईनः** ग्राहकांना हेल्प लाईन म्हणून बँकेने टोल फ्री नंबर उपलब्ध करुन दिला आहे. तो नंबर १८००-२१२-२११२ हा आहे.

**१२. ई-कॉमर्स सुविधाः** रूपे डेबिट कार्ड च्या सहाय्याने आता आपण इंटरनेट च्या युगात वेळ व कष्ट वाचवून घर बसल्या कोणत्याही वस्तूची खरेदी करु शकतो. वीज बील, फोन बील अथवा कोणत्याही प्रकारचे बील रांगेमध्ये उभे न रहाता मिनिटासरशी भरु शकतो. डिश टिव्ही, मोबाईल रिचार्ज देखील करू शकतो.

**रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या अधिकाऱ्यांची माण देशी बँकेस भेटः** दि. १९ ऑगस्ट २०१७ रोजी रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या अधिकाऱ्यांनी माण देशी बँक, शाखा धायरी, पुणे येथे भेट देवून बँकेने नव्याने सुरु केलेल्या मायक्रो-एटीएम सुविधा, गट कर्ज वाटप, आठवडा बाजारात व्यवसाय करणाऱ्या महिलांना कर्ज वाटप या योजनांची माहिती घेवून माण देशी बँकेच्या लाभार्थी महिलांशी चर्चा केली.
माण देशी बँक महिला उद्योजिका घडविणे हा उद्धेश उराशी बाळगून महिला उद्योजिकांना भांडवल व माण देशी फौंडेशनमार्फत महिलांना प्रशिक्षण देवून त्यांना सबल करते. जगभरात माण देशीच्या दुहेरी संगमाचे (घरपोच भांडवल व घरपोच व्यवसाय प्रशिक्षण लाभ मिळवून देणारे) माण देशी रोल मॉडेल हे एकमेव मॉडेल आहे.

# २१ वा वार्षिक अहवाल सन २०१७-१८

## भागभांडवल :-

बँकेचे अधिकृत भागभांडवल रु. १० कोटीचे आहे. वर्ष अखेरीस रु. ६०९.३० लाख एवढे जमा झाले आहे. या वर्षात भागभांडवलात रु. ६५.६० लाख इतकी वाढ झालेली असून ही वाढ १२.०७ % एवढी आहे. वर्षाअखेर एकूण ३३६२ नवीन सभासद झाले तसेच मृत्यू राजीनामा इत्यादीमुळे २२५५ सभासद कमी झाले. त्यामुळे वर्षाअखेर एकूण सभासद संख्या २६०८५ झाली आहे.

## गंगाजळी व निधी :-

मागील वर्षाअखेर गंगाजळीसह इतर निधी रु. २३६.७२ लाख होती. अहवाल वर्षात त्यात रु. २९.६८ ने वाढ होऊन अहवालवर्षा अखेर गंगाजळी, थकव्याज निधी,राखीव निधीची रक्कम रु. २५५.२२ लाख इतकी झाली आहे. या वर्षात वाढीचे शेकडा प्रमाण १४.३३ % इतके आहे.

## ठेवी व विमा संरक्षण :-

मार्च २०१७ च्या ठेवी रु. ८९४२.०० लाखावरुन मार्च २०१८ अखेर रु. ९७५२.४१ लाख एवढ्या झाल्या आहेत. ही वाढ रु. ८१०.४१ इतकी असून, ठेव वाढीचे प्रमाण ९.०६% आहे. या वाढत्या व बदलत्या स्पर्धेत ठेव वाढी बरोबर नफा क्षमता वाढविणे हे ही महत्वाचे आहे त्यामुळे ठेवीच्या व्याजावरील खर्चाचे प्रमाण विचारात घेता ठेवीवरील व्याज दर कमी करावे लागले तरीही आपण एवढ्या ठेवी गोळा केल्या. सभासदांचा,ठेवीदारांचा बँकेवरील विश्वास स्पष्ट आहे. सर्व ठेवी डिपॉझिट इन्श्युरन्स आणि क्रेडिट गँरंटी कार्पोरेशन (DICGC) अंतर्गत सुरक्षित आहेत. त्यांची दर सहामाही विम्याच्या हप्त्याची रक्कम डी.आय.सी. जी.सी. (DICGC) कडे बँक भरते.

## कर्ज :-

गतवर्षी येणे कर्ज रु. ५६८५.९३ लाख इतके होते या वर्षी त्या मध्ये रु. ७२७.१९ लाख एवढ्या रकमेची वाढ झालेली आहे. एकूण कर्ज मार्च २०१८ अखेर ६४१३.१२ लाख एवढे असून कर्ज वाढीचे प्रमाण १२.७९ % आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकाप्रमाणे योग्य तारणी कर्ज वाटपाबद्दल केलेल्या मार्गदर्शना प्रमाणे कर्जवाटप करणे आवश्यक असलेने,चालू वर्षात आम्ही कर्ज प्रकारात वाढ करुन नवीन कल्पना आपल्यापुढे ठेवणार आहोत, स्थानिक लोकांना कर्ज उपलब्ध करुन देण्याची योजना राबविणार आहोत, बँकेचे ठेवीदारांशी, खातेदारांशी, कर्जदारांशी नेहमी सलोख्याचे संबंध असावेत म्हणून त्यात आम्ही नेहमी भर घालतो.

## अग्रक्रम क्षेत्रात कर्ज :-

भारतीय रिझर्व बँक धोरणाप्रमाणे एकूण कर्जाच्या ४०% कर्ज अग्रक्रम क्षेत्रास असावे. आपल्या बँकेत २०१७-२०१८ सालात सुद्धा अग्रक्रम क्षेत्रास ९२.४३ % कर्जवाटप केलेले आहे. ही आपली अभिमानाची बाब आहे. तसेच दुर्बल घटकांना ८९.६३% कर्जवाटप केले आहे.

## थकबाकी व कर्जवसुली :-

बँकेच्या आर्थिक उन्नतीमध्ये कर्जवाटप व त्यावरील व्याजाची व हप्त्यांची परिणामकारक वसुलीचा फार मोठा वाटा आहे. त्या दृष्टिने बँकेने सतत पाठपुरवठा केल्यामुळे अहवाल वर्षात थकबाकी चे प्रमाण नियंत्रित ठेवण्याचा प्रयत्न केला आहे त्यामुळे थकबाकीचे प्रमाण ४.१०% इतके आहे व वसुली ९५.९०% झाली आहे. व NPA चे प्रमाण २.०५% आहे.

## संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेली कर्जे :-

सदरचा तपशील(महाराष्ट्र सहकार कायदा कलम ७५(२)प्रमाणे) पा.नं.-१९ वर उपलब्ध आहे.

## नफा वाटणी :-२०१७-१८ या वर्षाच्या नफ्याची वाटणी खालील प्रमाणे सुचविण्यात येत आहे.

| चालू सालचा नफा | ६६६८०१८.२२ | |
|---|---|---|
| तपशील | रक्कम | % |
| राखीव निधी | १६६७००५.०० | २५% |
| लाभांश (५%) | २६७७९५१.०० | |
| इमारत निधी | १०७३०६२.२२ | |
| गुंतवणूक चढउतार निधी | १२५००००.०० | |
| एकूण | ६६६८०१८.२२ | |

## शाखा विस्तार :-

बँकेला सातारा, सोलापूर, सांगली, रत्नागिरी, पुणे, कोल्हापूर व रायगड या सात जिल्ह्यांच्या कार्यक्षेत्राची मान्यता मिळालेली आहे. भविष्यात बँक या सात जिल्ह्यांत शाखांचे विस्तारीकरण करणार आहे. बँक शाखा विस्तारासाठी RBI ला प्रस्ताव पाठविणार आहे.

## सभासदांची वर्गवारी:-

महाराष्ट्रातील मागासवर्गीय महिलांना एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रतिनिधीत्व देणारी आपली पहिलीच महिला बँक आहे.

१) मागासवर्गीय - २५% २) ओ.बी.सी. - १३% ३) एन्. टी. ८% ४) ओपन - ५४%

## गुंतवणूक:-

बँकेने दि. ३१/३/२०१८ या वर्षात रु. ३४३१.७५ लाख इतकी गुंतवणूक केलेली आहे. सरकारी रोखेमध्ये गुंतवणूक २२२९.९१ लाख व इतर बँकेमध्ये ७२१.७८ लाख व म्युच्युअल फंड ४८०.०० लाख अशी गुंतवणूक केलेली आहे.

## अंतर्गत तपासणी -

बँकेचे ३१/३/२०१८ अखेर संपणाऱ्या सहकारी वर्षासाठी अंतर्गत लेखापरिक्षण संगीता एस. अग्रवाल पुणे चार्टर्ड अकौटंटस यांनी केले असून त्यांनी बँकेस बहुमोल सूचना व मार्गदर्शन केले आहे.

## प्रशिक्षण कार्यक्रम:-

दरवर्षीप्रमाणे सन २०१७-१८ मध्ये माण देशी बँकेद्वारे संचालक व कर्मचाऱ्यांना कर्ज, वसुली, गट कर्ज वाटप, कॅशिअर, बँकिंग सॉफ्टवेअर संदर्भात प्रशिक्षण देण्यात आले. याशिवाय खालील विषयावंर प्रशिक्षण देण्यात आले.

| अ. क्र. | प्रशिक्षण विषय | प्रशिक्षणार्थी | प्रशिक्षक |
|---|---|---|---|
| १. | म.स.संस्था अधिनियम १९६० चे '' कलम १५६'' मध्ये सतत होणारे बदल, वापराचे अधिकार व अंमलबजावणीतील अडचणी याबाबतचे प्रशिक्षण | सौ. रुक्साना मुलाणी व श्री. प्रसन्न नारायणे | सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था मर्यादित, कराड |
| २. | '' शहरी सहकारी बँकांसाठी बँकेची धोरणे व समस्या'' या विषयावरती परिसंवाद | सौ. रेखा कुलकर्णी व श्री. धनंजय भोकरे | कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चर बँकींग (CAB), आरबीआय,पुणे |
| ३. | कर्मचारी व संस्था यांना उद्देशपुर्तीच्या दृष्टीने संरेखीत करणे | सर्व बँक कर्मचारी | श्री. उन्मेश ब्राम्हे व श्री. प्रसाद मेमन, मनुष्यबळ विकास सल्लागार |
| ४. | एनएसीएच/इसीएस माहितीचे प्रशिक्षण | शाखाधिकारी व इतर कर्मचारी | श्री.पवार व्ही. बी., आय टी मॅनेजर |

## अभिनंदन:-

● माण देशी चॅम्पियन खेळाडू कु. वैष्णवी सावंत मु.पो. पुळकोटी ता. माण हिने बडोदा येथील १५ व्या ''नॅशनल युथ ॲथलेटीक्स'' स्पर्धेत २००० मी. ट्रिपलचेसमध्ये रौप्य पदक मिळवले.

● ॲथलेटीक असोसिएशनच्या मार्फत गुजरात येथे झालेल्या मैदानी स्पर्धेत कु. आदिती बुगड रा. इचलकरंजी हीचा थाळी फेक या खेळामध्ये अठरा वर्षाखालील वयोगटामध्ये चौथा क्रमांक आला.
त्याबद्दल दोघींचे माण देशी परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन .......... !

**********

## श्रद्धांजली:-

अहवाल सालात बँकेचे जे ज्ञात, अज्ञात, सभासद, ग्राहक, ठेवीदार, हितचिंतक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ज्या थोर विभूती पंचतत्वात विलीन झाल्या तसेच देशाच्या सीमारक्षणासाठी ज्या शूर जवानांनी आत्मबलिदान केले त्यांच्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रद्धाजंली.

## बँकेची वैशिष्ट्ये

* व्यापारी बँकापेक्षा ठेवीवर अर्धा टक्का अधिक व्याज.
* नवीन पॅनकार्ड काढण्याची सुविधा
* आर.टी.जी.एस., एन.ई.एफ.टी. व एस.एम.एस. बँकींग सेवा उपलब्ध.
* ए.टी.एम. मशीन व रूपे डेबीटकार्डच्या साहाय्याने आर्थिक व्यवहार
* चेक ट्रंकेशन सिस्टिम (सी.टी.एस.)
* रूपये १ लाख पर्यंतच्या ठेवींना विमा संरक्षण
* वीजबीले स्विकारण्याची सोय * महिलांसाठी UTI पेन्शन योजना
* आठवडे बाजार करणाऱ्या महिलांसाठी जागेवरच कर्जाची उपलब्धता.
* आठवडे बाजार करणाऱ्या व जे.एल.जी. कर्जदार महिलांसाठी आर्युविमा संरक्षण.
* जेष्ठ नागरीकांच्या ठेवीवर ०.५% अधिक व्याज
* व्यक्तीगत जिव्हाळा आणि तत्पर व घरपोच सेवा.

## ठेवीचे व्याजदर

| | |
|---|---|
| सेव्हिंग्ज ठेव ३% | ३६६ दिवस ते ४५६ दिवस ७.५% |
| १५ दिवस ते ४५ दिवस ४.५% | ४५७ दिवस ते ५ वर्षापर्यंत ८.५% |
| ४६ दिवस ते ९० दिवस ५% | दामदिडपट ठेव-४ वर्षे ६ महिने २१ दिवस |
| ९१ दिवस ते १८० दिवस ५.५% | दामदुप्पट ठेव -७ वर्षे ९ महिने २० दिवस |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस ६.५% | ५ वर्षाच्या पुढे - ९% |

* जेष्ठ नागरिक ०.५% जादा व्याजदर

## बँकेचा शाखा विस्तार

शाखा म्हसवड फोन: (०२३७३) २७०११९
शाखा गोंदावले बु।। फोन: (०२१६५) २५८०१४
शाखा वडूज फोन: (०२१६१) २३२४७०
शाखा दहिवडी फोन: (०२१६५) २२०३८०
शाखा सातारा फोन: (०२१६२) २३८५२२
शाखा लोणंद फोन: (०२१६९) २२६०९०
शाखा धायरी, पुणे फोन: (०२०) २४६९०३८८

**शाखा म्हसवड, वडूज व गोंदवले येथे लॉकर सुविधा उपलब्ध आहे.**

## * बँकर्स *

दि. महाराष्ट्र स्टेट को-ऑप बँक लि. मुंबई
सातारा जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि. सातारा
बँक ऑफ बडोदा, दहिवडी
बँक ऑफ महाराष्ट्र शाखा-म्हसवड, गोंदवले बु।।
बँक ऑफ इंडिया शाखा - बुध,दहिवडी
आय.डी.बी.आय म्हसवड, राणंद, लोणंद, पुणे
एस.बी.आय. वडुज, दहिवडी, ॲक्सीस बँक सातारा
यस बँक, पुणे

## शासकीय लेखापरिक्षक

के.जी.बी. ॲण्ड असोसिएटस्
चार्टर्ड अकौटंटस,कोल्हापूर

## अंतर्गत लेखापरिक्षक

संगीता एस. अग्रवाल पुणे चार्टर्ड अकौटंटस्

## कायदेशीर सल्लागार

ॲड. भोईटे विलासराव एन.(सातारा)
ॲड. माने एस. एम.(म्हसवड)
ॲड. काझी एन. एच.(म्हसवड)

# लेखापरीक्षण अहवाल

प्रति,
मा. सभासद
माण देशी महिला सहकारी बँक लि. म्हसवड
ता. माण जि. सातारा

संदर्भ: आपले नियुक्ती पत्र क्र. मुख्य कार्यालय- १०८/०९/२०१७ दि. ०७.०९.२०१७

१. आम्ही माण देशी महिला सहकारी बँक लि. म्हसवड या बँकेच्या सोबत जोडलेल्या दि. ३१.०३.२०१८ च्या ताळेबंदाचे व त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षाच्या नफा/तोटा पत्रकाचे आणि रोख जमा खर्च पत्रकाचे तसेच सदर आर्थिक पत्रकांचा भाग असणारी महत्वपूर्ण आर्थिक धोरणे व अन्य अनुषंगिक माहिती यांचे लेखापरिक्षण केले आहे. आर्थिक वर्ष ०१.०४.२०१७ ते ३१.०३.२०१८ या कालावधीच्या आर्थिक पत्रकांमध्ये आम्ही लेखापरिक्षण केलेल्या ७ शाखा व मुख्य कार्यालय यांच्या आर्थिक व्यवहारांचा समावेश आहे.

## व्यवस्थापनाची आर्थिक पत्रकांबाबतची जबाबदारी

२. बँकेच्या व्यवस्थापनाची ही जबाबदारी आहे की, सदरची आर्थिक पत्रके हि बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट १९४९, रिझर्व्ह बँकेची मार्गदर्शक तत्वे आणि महाराष्ट्र सहकारी संस्था निबंधक यांची मार्गदर्शक तत्वे आणि महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा, १९६०, भारतामध्ये सर्व मान्य असणारी अकौंटींग तत्वे यांना अनुसरुन बनविली जातील ज्यामुळे सदरची आर्थिक पत्रके ही बँकेच्या आर्थिक स्थितीची सत्य व रास्त स्थिती दर्शवितील. सदरच्या जबाबदारीमध्ये आर्थिक पत्रके तयार करताना आवश्यक असणाऱ्या अंतर्गत नियंत्रणासाठीचे नियम तयार करणे, त्यांची अंमलबजावणी करणे व वेळोवेळी त्यामध्ये सुधारणा करणे आदि बाबींचा समावेश होतो की, ज्यामुळे सदरची आर्थिक पत्रके ही चूका अथवा गैरव्यवहार यामुळे निर्माण होणाऱ्या गंभीर दोषांपासून मुक्त राहतील.

## लेखापरिक्षकांची जबाबदारी

३. आमची जबाबदारी ही आम्ही केलेल्या लेखापरिक्षणाच्या आधारे त्या आर्थिक पत्रकावर मत नोंदविण्याची आहे. आम्ही आमचे लेखापरिक्षण हे दि इन्स्टिटयुट ऑफ चार्टर्ड अकौटंटस ऑफ इंडिया यांनी निर्देशित केलेल्या ऑडिटींग स्टॅन्डर्डस्ना अनुसरुन केलेले आहे. या स्टॅन्डर्डनुसार आम्ही नितीतत्वांचे अनुपालन करणे तसेच लेखापरीक्षणाचे नियोजन व प्रत्यक्ष कार्यवाही अशा पद्धतीने करणे अपेक्षित आहे की, जेणे करुन त्या आर्थिक पत्रकांमध्ये गंभीर स्वरुपाच्या चुका नाहीत, याची रास्त खात्री करुन घेतली जाईल.

४. आर्थिक पत्रकांमधील रक्कमांच्या संदंभातील व इतर माहितीच्या संदर्भातील पुरावे नमुना तत्वांवर तपासण्याचा अंतर्भाव लेखापरिक्षणामध्ये होता. लेखापरिक्षणाच्या पद्धतीची निवड ही लेखापरिक्षकांचे अनुमान तसेच आर्थिक पत्रकांमध्ये चुका अथवा अफरातफर यामुळे गंभीर दोष निर्माण होण्याच्या शक्यतेची पडताळणी आदी बाबी गृहित धरुन केली जाते. अशा जोखमींची पडताळणी करुन योग्य अशी लेखापरिक्षण पद्धती निवडताना लेखापरिक्षक प्रामुख्याने बँकेने आर्थिक पत्रके तयार करताना अवलंबलेली अंतर्गत नियंत्रण पद्धती विचारात घेतात. परंतु ही पद्धती बँकेच्या अंतर्गत नियंत्रण प्रणालीच्या प्रभावीपणाबद्दल मत व्यक्त करण्याकरीता निवडली जात नाही. लेखापरिक्षणामध्ये, व्यवस्थापनाने वापरलेल्या अकौटींग तत्वाच्या योग्यतेचे मुल्यमापन करणे, व्यवस्थापनाने केलेल्या महत्वाच्या आर्थिक अंदाजाच्या योग्यतेचे मुल्यमापन करणे व आर्थिक पत्रकांच्या सादरीकरणाचे मुल्यमापन करणे याचा सुद्धा समावेश होतो.

५. आमचा विश्वास असा आहे की, आमच्या लेखापरिक्षणा दरम्यान आम्हाला मिळालेले पुरावे आम्हाला आमचे लेखापरिक्षणाबाबतचे मत बनविण्यासाठी यथार्थ आधार मिळवून देतात.

अभिमत

६. आमच्या मते आम्हाला दिलेल्या संपूर्ण माहिती तसेच खुलाशावरुन हे हिशोब, त्या सोबतची टिपण व त्यासोबत जोडलेली परिशिष्ठे आणि आमच्या लेखापरिक्षण अहवालातील मुद्दे यांना अनुसरुन बँकींग रेग्युलेशन ॲक्ट १९४९, महाराष्ट्र सहकारी संस्थाचा १९६० चा कायदा, रिझर्व्ह बँकेच्या तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था निबंधक यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार व त्याखालील नियमान्वये अपेक्षित अशा रितीने आवश्यक अशी सर्व माहिती देतात तसेच भारतामध्ये सर्वमान्य असणाऱ्या अकौटींग तत्वांचे अनुपालन करतात आणि

अ. ताळेबंदच्या बाबतीत दि. ३१.०३.२०१८ च्या बँकेच्या आर्थिक परिस्थितीची आणि

ब. नफा/तोटा पत्रकाच्या बाबतीत या दिनांकास संपणाऱ्या वर्षाच्या मुदतीत बँकेच्या नफ्याची आणि

क. रोख जमा खर्च पत्रकाच्या बाबतीत या दिनांकास संपणाऱ्या वर्षाच्या मुदतीत बँकेच्या रोख रकमेच्या प्रवाहाची सत्य व रास्त स्थिती दर्शवितात.

७. सदर बँकेचे ताळेबंद पत्रक व नफा तोटा पत्रकामधील नमुना " अ " व " ब " हे अनुक्रमे बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ च्या परिशिष्ठ तीन तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या तरतुदीनां अनुसरुन तयार केले आहेत.

८. परिच्छेद क १ ते ५ मध्ये नमुद केलेल्या लेखापरिक्षण पद्धती आणि मुख्य व शाखा अहवालातील भाग अ, ब आणि क मध्ये नमुद केलेल्या शेऱ्यास अनुसरुन तसेच आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे आणि आम्हाला दिलेल्या संपूर्ण माहिती तसेच खुलाशावरुन आणि बँकेने सादर केलेल्या हिशोब व त्यासोबत जोडलेली परिशिष्ठ यांना अनुसरुन आम्ही अहवाल करतो की,

१. आमच्या लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी, आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती माहिती व खुलासे उपलब्ध झाले आहेत व ते समाधानकारक आहेत.

२. आमच्या मते, लेखापरीक्षणा दरम्यान तपासलेली सर्व हिशोब पुस्तके कायद्यानुसार बँकेने ठेवलेली आहेत. तसेच लेखापरीक्षाच्या दृष्टीने शाखांकडून प्राप्त झालेली विवरणे पुरेशी आहेत.

३. आमच्या दृष्टीपतास आलेले बँकेचे व्यवहार हे बँकेच्या अधिकार क्षेत्रास अधिन राहून केलेले आहेत.

४. बँकेचा ताळेबंद तसेच नफा तोटा पत्रक हे बँकेची हिशोब पुस्तके व विवरण पत्रे यांना अनुसरुन केलेली आहेत.

५. बँकेने अवलंबलेली अकौंटिंग स्टॅन्डर्डस् (ए.एस.२२ वगळता) ही भारतामध्ये सर्व मान्य असणाऱ्या अकौंटींग तत्वांना अनुसरुन केलेली आहेत.

९. आम्हाला मिळालेल्या माहिती व स्पष्टीकरण आणि हिशोब पुस्तके व इतर रेकॉर्ड तपासणी करताना महाराष्ट्र सहकारी नियम १९६१ मधील कलम ६९ (६) मध्ये नोंदवलेल्या बाबींबाबत दखल घेण्याजोगे व्यवहार आढळून आलेले नाहीत.

१०. तसेच आम्ही अहवाल करतो की,

**आर्थिक वर्ष २०१७-१०१८ करिता संस्थेस वर्ग "अ" देण्यात आलेला आहे.**

के. जी.बी. ॲण्ड जे असोसिएटस् करिता
चार्टर्ड अकौटंटस्

स्थळ : कोल्हापूर
दिनांक : ०६.०६.२०१८

संतोष तासे
भागिदार
मेंबरशीप क्र.१०८९२५
एफ आर एन ११४८४९ W

K G B & J ASSOCIATES CHARTERED ACCOUNTANTS KOLHAPUR

## माण देशी महिला सह. बँक लि. म्हसवड ता. माण

### बँकेची प्रगती

| अ. क्र. | तपशील | २००८ | २००९ | २०१० | २०११ | २०१२ | २०१३ | २०१४ | २०१५ | २०१६ | २०१७ | २०१८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सभासद संख्या | ७६३० | ९३९२ | ११३६६ | ११८७१ | १२२२० | १४०५३ | १७१७३ | २२७०१ | २५८३२ | २४९७८ | २६०८५ |
| | | | | | | | | | | | | ₹ लाखात |
| १ | भागभांडवल | १४८.२० | १८३.५४ | २२३.४२ | २६०.०६ | २७६.५३ | ३०८.८१ | ३८४.६७ | ४७०.०० | ५१७.३७ | ५४३.७० | ६०९.३० |
| २ | एकूण ठेवी | १३२६.४६ | १७८२.३० | २७२१.५६ | ३३३८.२५ | ४०००.०० | ४८०१.११ | ६३१८.०० | ७६३३.२१ | ८७८२.०७ | ८९४२.०० | ९७५२.४१ |
| ३ | एकूण कर्जवाटप | ८५९.३५ | ९१०.५८ | १४४२.१४ | २२४०.११ | २६४१.८३ | २८५३.५९ | ३९५०.३७ | ५३१८.४८ | ५१११.५२ | ५६८५.९३ | ६४१३.१२ |
| ४ | गुंतवणूक | ५५३.८९ | ८७५.११ | १०२९.९३ | ८३९.६१ | ११९१.३३ | १७८७.३५ | २२९२.३९ | २२४१.४७ | ३४४०.७३ | ३०१०.९४ | ३४३१.७५ |
| ५ | खेळते भांडवल | १६२८.९६ | २११४.११ | ३०८४.५३ | ३७३३.१५ | ४४११.३१ | ५३७०.५३ | ७१५१.१४ | ८६३०.८७ | ९८७२.९७ | १०१७०.२१ | ११९४७.९५ |

## परिशिष्ट 'अ'

| | |
|---|---|
| १) बँकेचे नांव | :- माण देशी महिला सहकारी बँक लि. म्हसवड |
| २) मुख्य कार्यालयाचा पत्ता | :- मु. पो. म्हसवड ता. माण जि. सातारा पिन नं. ४१५५०९ |
| ३) नोंदणी क्रमांक व तारीख | :- एस. ए. टी.(माण)/बी.एन.के.(ओ)/११९/सन १९९६ दि. ३१/१०/१९९६ |
| ४) रिझर्व बँक परवाना क्रमांक व तारीख | :- एल.एन.एम.ए.एच.यु.बी.डी. १३६१ पी ,२७/१/१९९७ |
| ५) कार्यक्षेत्र | :- सातारा, सोलापूर, सांगली, रत्नागिरी, रायगड, पुणे,कोल्हापूर जिल्हे |

## दि. ३१/०३/२०१८ रोजीची आर्थिक स्थिती

(रक्कम ₹ लाखात )

| | | |
|---|---|---|
| शाखा-मुख्यालय | | ७ |
| सभासद | १. अ वर्ग | २६०८५ |
| | २. ब वर्ग | ४८९३ |
| वसुल भागभांडवल | | ₹६०९.३० |
| राखीव व इतर निधी | | ₹४५७.७७ |
| ठेवी (₹९७५२.४१) | अ) बचत ठेव | ₹१६००.०५ |
| | ब) चालू ठेव | ₹४८६.५१ |
| | क) मुदत ठेव | ₹७६६५.८५ |
| कर्जे( ₹६४१३.१२) | अ) तारणी | ₹४३६९.४० |
| | ब) बिनतारणी | ₹२०४३.७२ |
| | क) अग्रक्रम क्षेत्र कर्जपुरवठा टक्केवारी | ९२.४३% |
| | ड) दुर्बल घटक कर्जपुरवठा टक्केवारी | ८९.६३% |
| बाहेरील कर्जे | | ₹०.०० |
| गुंतवणूक (₹ ३४३१.७५) | सातारा डी.सी.सी.बँक लि. | ₹१८४.८२ |
| | शासकीय मान्यताप्राप्त रोखे | ₹२२२९.९१ |
| | इतर | ₹१०१७.०२ |
| थकबाकीचे येणे कर्जाशी शेकडा प्रमाण | | ४.१०% |
| ऑडीटवर्ग | | 'अ' |
| नफा | | ₹६६.६८ |
| एकूण कर्मचारी | | ७४ |
| खेळते भांडवल | | ₹११९४७.९५ |

रिझर्व्ह बँक परिपत्रक क्र. ५२ दि. २५.०३.२०१४ नुसार बँकांनी ताळेबंद सोबत द्यावी लागणारी माहिती

(रक्कम ₹ लाखात)

| अ. नं. | तपशील | ३१/०३/१७ | ३१/०३/१८ | वाढ/घट |
|---|---|---|---|---|
| १ | **भांडवल पर्याप्तता (शेकडा प्रमाण)** | १५.४६% | १४.३१% | -१.१५% |
| २ | **भांडवल निधी तपशील** | | | |
| | टायर- १ निधी | ८२५.७४ | ८८८.९९ | ६३.२५ |
| | टायर -२ निधी | ४०.२९ | ५९.०८ | १८.७९ |
| | **एकूण निधी** | ८६६.०३ | ९४८.०७ | ८२.०४ |
| | एकूण जोखीम मालमत्ता | ५६०१.५१ | ६६२४.०३ | १०२२.५२ |
| ३ | **भांडवल निधीचे जोखीम मालमत्तेशी प्रमाण** | | | |
| | टायर- १ निधी | १४.७४% | १३.४२% | -१.३२% |
| | टायर -२ निधी | ०.७२% | ०.८९% | ०.१७% |
| | **एकूण निधी** | १५.४६% | १४.३१% | -१.१५% |
| | गुंतवणूक व त्यांचे मुल्यांकन | | | |
| ४ | **अ. एस.एल.आर गुंतवणूक** | | | |
| | १. सरकारी कर्जरोखे | २२९६.५८ | २२२९.९१ | -६६.६७ |
| | **एकूण** | २२९६.५८ | २२२९.९१ | -६६.६७ |
| | **ब. बँक व इतर गुंतवणूक** | | | |
| | १. राष्ट्रीयकृत खाजगी व सहकारी बँकांतील ठेवी | ६२१.६६ | १०१७.०२ | ३९५.३६ |
| | २. डी.सी.सी.बँक ठेव | ९२.६५ | १८४.७७ | ९२.१२ |
| | **एकूण** | ७१४.३१ | १२०१.७९ | ४८७.४८ |
| | **क. शेअर्समधील गुंतवणूक** (एम.एस.सी.बँक,डी.सी.सी.बँक, बँक असो.) | ०.०५ | ०.०५ | ००.० |
| | **एकूण (अ+ब+क)** | ३०१०.९४ | ३४३१.७५ | ४२०.८१ |
| | **ड. मुल्यांकन** | | | |
| | १. दर्शनी किंमत | २३४२.०० | २२८७.०० | -५५.०० |
| | २. पुस्तकी किंमत | २२९६.५८ | २२२९.९१ | -६६.६७ |
| | ३. बाजारभावाने होणारी किंमत | २३०२.५७ | २२३९.९० | -६२.६७ |

| अ. नं. | तपशील | ३१/०३/१७ | ३१/०३/१८ | वाढ/घट |
|---|---|---|---|---|
| | ई. उत्पादनक्षमता नसलेली गुंतवणूक तपशील | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ५ | घरकुल, बांधकाम, व्यवसाय यासाठी दिलेल्या कर्जाचा तपशील | | | |
| | १. बांधकाम व्यवसायिक यांना दिलेले कर्ज | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | २. घरकुल व दुरुस्तीअंतर्गत दिलेले कर्ज | ४६१.१३ | ५४०.३१ | ७९.१८ |
| | एकूण | ४६१.१३ | ५४०.३१ | ७९.१८ |
| ६ | शेअर्स व डिबेंचरर्स तारणावर दिलेली कर्जे | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ७ | संचालक नातेवाईक यांना दिलेली कर्जे | ०.०० | २०.०० | २०.०० |
| | फंडबेस कर्जाचा तपशील | ०.०० | २०.०० | २०.०० |
| | नॉन फंडबेस कर्जाचा तपशील | ०.०० | २०.०० | २०.०० |
| ८ | ठेवीचा सरासरी व्याजदर | ८.८७% | ८.०५% | -०.८२% |
| ९ | एन.पी.ए. चा तपशील | | | |
| | अ. ढोबळ एन.पी.ए. शेकडा प्रमाण | ४.११% | ४.२४% | ०.१३% |
| | ब. निव्वळ एन.पी.ए. शेकडा प्रमाण | २.३३% | २.०५% | -०.२८% |
| १० | एन.पी.ए. मुव्हमेंट | | | |
| | आरंभीची एन.पी.ए. रक्कम | ११२.७६ | २३३.९५ | १२१.१९ |
| | + चालु वर्षातील एन.पी.ए. खाती | २०३.२४ | २३५.९० | ३२.६६ |
| | - चालु वर्षातील वसुलीची रक्कम | ८२.०५ | १९८.०० | ११५.९५ |
| | शिल्लक एन.पी.ए. रक्कम | २३३.९५ | २७१.८५ | ३७.९० |
| ११ | एन.पी.ए. वर्गीकरणानुसार वसुलीचा तपशील | | | |
| | सब स्टॅन्डर्ड | ६०.३१ | ८९.५४ | २९.२३ |
| | डाऊटफुल एक वर्षापर्यंत | ६.०६ | ९४.२३ | ८८.१७ |
| | डाऊटफुल एक ते दोन वर्षापर्यंत | १४.४१ | ११.१६ | -३.२५ |
| | डाऊटफुल तीन वर्षापर्यंत | १.२७ | ३.०७ | १.८० |
| | एकूण एन.पी.ए. | ८२.०५ | १९८.०० | ११५.९५ |

| अ. नं. | तपशील | ३१/०३/१७ | ३१/०३/१८ | वाढ/घट |
|---|---|---|---|---|
| १२ | **एन.पी.ए. तरतूदीमधील चढउतार** | | | |
| | आरंभीची तरतूद | ८६.०१ | १०४.०१ | १८.०० |
| | + चालु वर्षातील तरतूद | १८.०० | ३९.४६ | २१.४६ |
| | **एकूण तरतूद** | **१०४.०१** | **१४३.४७** | ३९.४६ |
| १३ | **स्टॅन्डर्ड ॲसेट तरतूदीमधील चढउतार** | | | |
| | आरंभीची तरतूद | १३.१० | २३.७० | १०.६० |
| | + चालु वर्षातील तरतूद | १०.६० | २.७७ | -७.८३ |
| | **एकूण तरतूद** | **२३.७०** | **२६.४७** | २.७७ |
| १४ | **नॉन परफॉर्मींग गुंतवणूकीपोटी केलेल्या तरतूदीमधील चढउतार** | | | |
| | आरंभची तरतूद | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | + चालु वर्षातील तरतूद | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | **एकूण तरतूद** | **०.००** | **०.००** | ०.०० |
| १५ | **गुंतवणूक चढउतार निधी** | | | |
| | आरंभीची तरतूद | ९.३९ | १३.८४ | ४.४५ |
| | + चालु वर्षातील वाढ व तरतूद | ४.४५ | १०.०० | ५.५५ |
| | **एकूण तरतूद** | **१३.८४** | **२३.८४** | १०.०० |
| १६ | **गुंतवणूक,घसारा निधीमधील चढउतार** | | | |
| | आरंभीची तरतूद | २.१५ | ०.०० | -२.१५ |
| | + चालु वर्षातील तरतूद | -२.१५ | ०.०० | २.१५ |
| | **एकूण तरतूद** | **०.००** | **०.००** | ०.०० |
| १७ | **खेळत्या भांडवलाशी** | | | |
| | १. मिळालेल्या व्याजाचे शेकडा प्रमाण | १०.५४% | १२.९०% | २.३६% |
| | २. इतर उत्पनाचे शेकडा प्रमाण | ०.८५% | ०.६०% | -०.२५% |
| | ३. ढोबळ नफ्याचे शेकडा प्रमाण | ०.७९% | ०.९८% | ०.१९% |

| अ. नं. | तपशील | ३१/०३/१७ | ३१/०३/१८ | वाढ/घट |
|---|---|---|---|---|
| | ४. निव्वळ नफ्याचे शेकडा प्रमाण | ०.५६% | ०.६०% | ०.०४% |
| | ५. व्यवस्थापकीय खर्चाचे शेकडा प्रमाण | ३.६३% | ४.१७% | ०.५४% |
| | ६. प्रती सेवक व्यवसाय | २१५.१२ | २१८.४५ | ३.३३ |
| | ७. प्रती सेवक नफा | ०.८३ | ०.९० | ०.०७ |
| १८ | **परकीय चलनामधील व्यवहाराची माहीती** | | लागू नाही | |
| १९ | **रिझर्व्ह बँकेने पेनल्टी आकारली असल्यास त्याचा तपशील** | | लागू नाही | |
| २० | **रिस्ट्रक्चर केलेल्या कर्ज खात्यांचा तपशील** | **घरकुल कर्जे** | **एस.एम.ई.कर्जे** | **इतर कर्जे** |
| | अ. स्टॅन्डर्ड रिस्ट्रक्चर केलेली कर्जे | | | |
| | १. खातेसंख्या | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | २. रक्कम | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | ३. तारण मुल्यातील घट | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | ब. सबस्टॅन्डर्ड रिस्ट्रक्चर केलेली कर्जे | | | |
| | १. खातेसंख्या | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | २. रक्कम | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | ३. तारण मुल्यातील घट | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | क. डॉऊटफुल रिस्ट्रक्चर केलेली कर्जे | | | |
| | १. खातेसंख्या | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | २. रक्कम | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | ३. तारण मुल्यातील घट | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | एकूण (अ+ ब + क) | | | |
| | १. खातेसंख्या | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | २. रक्कम | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | ३. तारण मुल्यातील घट | ०.०० | ०.०० | ०.०० |
| २१ | **बँकेच्या स्थावर मालमत्तेचे पुनर्मुल्यांकन केले असल्यास त्याचा तपशील** | | | |

## 22.i) Composition of National & Co-operative Investment

| Sr. No | Issuer | Amount | Extent of below Investment grade Securities | Extent of unrated Securities | Extent of unlisted Securities |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | PSUs | -- | -- | -- | -- |
| 2 | FIs | -- | -- | -- | -- |
| 3 | Public Sector Banks | | | | |
| | 1) State Bank Of India | 284.17 | | | |
| | 2) IDBI Bank Ltd. | 150.00 | | | |
| | 3) Bank of Maharashtra | 83.50 | | | |
| | 4) Bank of Baroda | 19.00 | | | |
| | Total | 536.67 | | | |
| 4 | Mutual Funds | 480.00 | -- | -- | -- |
| 5 | Others | | | | |
| | 1. DCC Reserve Fund | 29.14 | | | |
| | 2. Karad Urban Co-op. Bank | 0.35 | | | |
| | 3. Satara DCC Bank Ltd. | 155.63 | | | |
| | Total | 185.12 | | | |
| 6 | Provision held towards depreciation | -- | -- | -- | -- |

## ii) Non - performing Non- SLR Investment

| Particulars | Amount (₹ in Crore) |
|---|---|
| Opening Balance | ---- |
| Addition during the year since 1st April | ---- |
| Reductions during the above period | ---- |
| Closing Balance | ---- |
| Total Provisions Held | ---- |

२३) ठेव विमा प्रिमियम तपशील:- (रक्कम ₹ लाखात)

| ठेव कालावधी | रक्कम अदा तारीख | ठेव विमा प्रिमीयम रक्कम |
|---|---|---|
| ०१.०४.२०१७ ते ३०.०९.२०१८ | २९.०४.२०१७ | ५.२५ |
| ०१.१०.२०१७ ते ३१.०३.२०१८ | ०६.११.२०१७ | ५.०१ |

